| | |
|---|---|
| MHAH180017272023 | **<u>फौजदारी किरकोळ अर्ज क्र.२३२/२०२३</u>**<br>स्वाती विशाल जोगदंड<br><u>विरुध्द</u><br>विशाल श्रीपती जोगदंड |

## <u>निशाणी क्र.५ वरील आदेश</u>

अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम, १८, १९, २०, २२ व ३१ प्रमाणे अंतरिम आदेश मिळण्याकरीता दाखल केला आहे. त्यानुसार अर्जदार हिने प्रस्तुत अर्जाच्या अंतिम निर्णयापावेतो सामनेवाले क्र.१ याचेकडून अंतरीम पोटगी मिळावी अशा आदेशाची विनंती केलेली आहे.

२. अर्जदार कथन करते की, सामनेवाला विरुध्द महिलांचे घरघुती हिंसाचारापासून संरक्षण कलम १८, १९, २०, २२ व ३१ अन्वये प्रस्तुतचा मुळ अर्ज दाखल केला आहे. सामनेवाला याचे अर्जदार हिला कायदेशीर रीत्या सांभाळण्याची जबाबदारी असतानादेखील सामनेवाला हा जबाबदारी पार पाडत नाही. सामनेवाला याने केलेल्या छळावरुन अर्जदार ही शारिरीक व मानसिकरीत्या खचून गेलेली आहे. तिच्याकडून कोणताही कामधंदा होत नाही. अर्जदार क्र. २ व ३ यांच्या पालनपोषणाची जबाबदारी अर्जदार क्र. १ यांच्यावर आहे, त्याकरीता अर्जदार हिला पैशाची खूप आवश्यकता आहे. सामनेवाला हा त्याची कायदेशीर जबाबदारी झटकून टाकून अर्जदाराचा सांभाळ करीत नाही. सामनेवाला हा ऐशोआरामात जिवन जगत आहे. अर्जदार ही तिचा चरितार्थ चालवण्यास असमर्थ आहे. सदरच्या अर्जाचे गुणदोषावर चौकशी होण्यास बराचसा कालावधी लागेल. त्यामुळे कायद्याच्या तत्वानुसार अर्जदारास इंटेरिअम ॲलेमनी मिळणे आवश्यक आहे. सामनेवाला क्र. १ हा सुप्रिम कोर्टात वकीली व्यवसाय करीत असून वकीली व्यवसायात खूप मोठे नाव मिळवले असुन त्यास दरमहा २५ ते ३० लाखांचे उत्पन्न मिळते. सामनेवाला यांचे मौजे जवळबंद, आंबेजोगाई, तालुका केज येथे विहिर बागायती शेतजमिन आहे. त्या जमिनीमध्ये सामनेवाला हे गहु, ज्वारी, ऊस, कांदे अशी पिके घेतात. त्यांना शेती

उत्पन्नापासून ८ ते १० लाखांचे उत्पन्न मिळते. तसेच सामनेवाला क्र. १ याचे नोएडा येथे स्वतःचे घर आहे. तसेच आंबेजोगाई येथे दुमजली इमारत असून तळमजला भाड्याने दिला आहे. त्यापासून दरमहा २० हजाराचे उत्पन्न मिळते. सामनेवाला क्र. २ व ३ हे पेन्शनर असून सामनेवाला नं. २ यांना दरमहा २५ हजार व सामनेवाला क्र. ३ यांना दरमहा ५० हजारांची पेन्शन मिळते. अशाप्रकारे सामनेवाला क्र. २ व ३ यांना एक ते सव्वा लाखाचे उत्पन्न मिळते. सामनेवाला याने अर्जदार हिला पोटगी देण्याची ऐपत असून अर्जदार क्र. १ ते ३ यांना दरमहा ५० हजार रुपये अंतरिम पोटगी मिळावी म्हणुन विनंती केली आहे.

**३.** सामनेवाला क्र. १ याने नि. १६ नुसार म्हणणे दाखल केले असून अर्जातील संपुर्ण कथन नाकारलेली आहेत. सामनेवालाचे कथन असे की, अर्जदार क्र. १ सोबत दि. ३१/०८/२००८ रोजी विवाह झाल्यानंतर काही दिवसांनी सामनेवाला क्र. १ हा अर्जदार हिस दिल्ली येथे राहण्यास गेले. तेथे त्यांनी कसेबसे २०२० पर्यंत एकत्र राहुन संसार केला. त्यानंतर अर्जदार हिच्या वागण्यात बदल होवू लागला. अर्जदार हि कोणतीही दैनंदिन कामे करीत नव्हती. सामनेवाला याने समजुन सांगण्याचा प्रयत्न केला असता, त्यास उद्धटपणे बोलायची तसेच सामनेवाला क्र. १ याच्या चारित्र्यावर संशय घ्यायची. २०२० मध्ये सामनेवाला हा कोविडच्या काळात मुळ गावी आंबेजोगाई येथे आला. त्यावेळी अर्जदार ही मुलांसह तिच्या आई–वडीलांकडे राहुरी येथे आली. त्यानंतर पुन्हा २०२१ मध्ये कोविड निर्बंध शिथील झाल्यानंतर अर्जदार हि दिल्ली येथे आली. त्यावेळी देखील अर्जदाराच्या वागण्यात प्रचंड बदल झाला होता. अर्जदार ही रात्री उशिरापर्यंत फोनवर गप्पा मारायची सामनेवाला क्र. १ यास सहवासापासून दूर ठेवायची. अर्जदार क्र. २ व ३ यांची शाळेची तयारी करीत नव्हती, उशिरा उठायची. अर्जदार ही छोट्या छोट्या मुद्द्यावरून भांडण करायची. अर्जदार क्र. १ हिने दिल्ली येथे मयुरविहार येथील पोलीस स्टेशनला खोटेनाटे आरोपी करुन तक्रार दाखल केली. तसेच महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अंतर्गत देखील तक्रार क्र. ४३९/२०२३ व २०७/२०२३ दिल्ली येथे दाखल केली. त्यानंतर सामनेवाला हा २०२२ मध्ये आंबेजोगाई येथे राहण्यास आला. तेथे देखील अर्जदाराने कोणतेही कारण नसताना सामनेवाला यास गलिच्छ भाषेत बोलण्यास सुरवात केली. अर्जदार हिने सामनेवालाची महत्त्वाची फाईल हातात घेतली व ती फाडण्यास सुरवात

केली. त्यावेळी सामनेवाला याने अर्जदार हिला रोखले असता, अर्जदार हिने सामान बांधुन आई–वडीलांच्या घरी सोडण्यास सांगितले. सामनेवाला हा तिच्या आई–वडीलांकडे घेवून गेला असता, तेथे देखील गलिच्छ भाषेत शिवीगाळ केली. सामनेवाला याने अर्जदार क्र. २ व ३ यांना सोबत आणण्याचा प्रयत्न केला असता अर्जदार हिने जबरदस्तीने त्यांना ठेवुन घेतले. तेव्हापासून अर्जदार हि स्वतःच्या मर्जीने तिच्या आई–वडीलांकडे राहते. अर्जदार हिने फोन वरुन धमकी दिल्याने सामनेवाला याने आंबेजोगाई येथे तक्रार अर्ज दाखल केले आहेत. तसेच अर्जदाराने देखील राहुरी पोलीस स्टेशन येथे सामनेवाला विरुध्द भा.द.वि. कलम ४९८–अ अन्वये फिर्याद दाखल केली असून सामनेवाला याने आंबेजोगाई येथे घटस्फोट मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. अर्जदार ही कोणतेही सबळ कारण नसताना स्वतःहून माहेरी निघुन गेली आहे. फक्त त्रास देण्यासाठी सामनेवालाविरुध्द अर्ज दाखल केला आहे, म्हणून अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केली आहे.

**४.** अर्जदार व सामनेवाले यांचेतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही पक्षांनी दाखल केलेले दस्तऐवज व युक्तीवाद यावरुन माझ्या अवलोकनार्थ खालील प्रश्न निर्माण झाले. सदर प्रश्न व त्याचे निष्कर्ष कारणमिमांसेसहीत पुढीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **प्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | प्रथमदर्शनी अर्जामध्ये सामनेवाला याने अर्जदारविरुध्द कौटुंबिक हिंसाचाराचे कृत्य केल्याचे दिसून येते काय? | होकारार्थी |
| २) | अर्जदार हि अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय? | अंशतः होकारार्थी |
| ३) | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमीमांसा

**प्रश्न क्र.१ करीता–**

**५.** अर्जदार ही सामनेवाला क्र. १ ची पत्नी आहे. अर्जदार क्र. २ व ३ हे सामनेवाला क्र. १ चे मुल आहेत. सामनेवाला क्र. २ ते ५ हे सामनेवाला क्र. १ चे आई–वडील व बहिणी

आहेत. अर्जदार व सामनेवाला क्र. १ चा विवाह २००८ साली राहुरी येथे झाला असून लग्नानंतर अर्जदार हि सामनेवाला सोबत दिल्ली येथे राहण्यास गेली, ही बाब उभयपक्षकारांना मान्य आहे. अर्जदार व सामनेवाला यांच्या कथनाचे अवलोकन केले असता, अर्जदार क्र. १ व सामनेवाला क्र. १ हे पती–पत्नी असून आज रोजी त्यांचा संबंध कायम आहे. अर्जदार ही सामनेवाला क्र. १ पासून तिच्या मुलांसह वेगळी राहत आहे, ही बाब नाकारण्यासारखी नाही. अर्जदार हिने अर्जामध्ये सामनेवाला क्र. १ हा तिच्या चारित्र्यावर संशय घेतो त्याचप्रमाणे सामनेवाला यानेदेखील अर्जदार हि सामनेवाला क्र. १च्या चारित्र्यावर संशय घेते, याबाबत एकमेकांविरुद्ध केलेले आरोप हे उभयपक्षकारांचा पुरावा आल्यानंतर ठरविणे उचित होणार आहे. महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा कलम २३ नुसार अंतरिम आणि आदेश मंजुर करण्याच्या अधिकाराबाबत तरतुद नमुद असून त्यानुसार सामनेवाला व त्याच्या कुटुंबियांनी घरगुती हिंसाचाराचे कृत्य केले आहे का असे प्रथमदर्शनी उघड केले असल्यास, सदर कायद्याच्या तरतुदीनुसार पिडीत व्यक्तीला अंतरिम आदेश मंजुर करण्याचा अधिकार आहे.

६. अर्जदाराने तिच्या मुळ अर्जात सामनेवाला याने कौटुंबिक हिंसाचाराचे कृत्य केल्याचे नमुद केले आहे. सामनेवाला याने दाखल केलेल्या म्हणण्यानुसार अर्जदार हिने दिल्ली येथे त्यांच्याविरद्ध महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अन्वये तक्रारी अर्ज दाखल केले आहेत. तसेच सामनेवाला यानेदेखील अर्जदाराविरुध्द आंबेजोगाई येथे अदखल पात्र गुन्ह्यासंदर्भात तक्रार दाखल केली आहे. अर्जदार हिला गलिच्छ भाषेत शिवीगाळ करणे, तिच्यासोबत अनैसर्गिक शारिरीक सुखाची मागणी करणे, अर्जदार हिला मारहाण करणे सदरची बाब अर्जदार हिने शपथेवर नमुद केली असून महिलांचे कौटुंबिक हिंसाचाराच्या कायदा कलम ३ नुसार घरगुती हिंसाचार आहे. त्यामुळे अर्जदार ही कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायद्यानुसार पिडीत व्यक्ती आहे. अंतरिम पोटगीच्या अर्जाच्या वेळी अर्जदाराने केलेले कथन सिद्ध करणे आवश्यक नाही. तसेच सामनेवाला याने देखील त्याने केलेले कथन सिद्ध करणे आवश्यक नाही. केवळ प्रथमदर्शनी कौटुंबिक हिंसाचार दिसून येतो का, हे पाहणे महत्त्वाचे आहे. अर्जामध्ये नमुद केलेल्या अर्जदाराच्या शारिरीक व मानसिक छळ, अर्जदारांचे पालनपोषण न करण्याच्या घटनांवरून दिसून येते की, हे सर्व घरगुती हिंसाचाराचे कृत्य आहे, हे प्रथमदर्शनी

दिसून येते. सामनेवाला याने अर्जदाराविरुध्द कौटुंबिक हिंसाचाराचे कृत्य केले आहे, त्यामुळे मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ बाबत–</u>**

**७.** अर्जदार हिला सामनेवाला क्र. १ याने केलेल्या शारिरीक व मानसिक त्रासामुळे अर्जदार हि तिच्या मुलांसह माहेरी राहात आहे. माहेरी राहात असल्यापासून सामनेवाला क्र. १ याने कोणतीही पालनपोषणाची व्यवस्था केलेली नाही. प्रस्तुत अर्जात सामनेवाला क्र. १ तसेच अर्जदार यांनी त्यांचा मुलगा शाल्क याच्या शिक्षणासंदर्भात शाळेतील दस्तऐवज दाखल केले असल्यामुळे सामनेवाला क्र. १ याने अर्जदाराच्या पालनपोषणाची जबाबदारी स्विकारली असे दिसून येत नाही. अर्जदाराने प्रस्तुत अर्जात सामनेवाला क्र. १ यांच्यापासून दरमहा ५० हजार रुपये अंतरिम पोटगी मिळावी म्हणुन मागणी केली आहे. अर्जदाराने मागणी केली म्हणुन सामनेवाला क्र. १ याचे तेवढे उत्पन्न आहे का, हे पाहणे गरजेचे आहे. याठिकाणी नमुद करण्यासारखी बाब अशी की, सामनेवाला क्र. १ हा वकीली व्यवसाय करीत असून त्यास दरमहा ३५ हजार रुपये उत्पन्न मिळते. तसेच सामनेवाला क्र. १ हा आयकर भरतो, ही बाब सामनेवाला याने संपत्ती व दायित्त्व प्रतिज्ञापत्र नि. १९ नुसार मान्य केले आहे. यावरुन सामनेवाला क्र. १ कमविण्यास समर्थ आहे, हे दिसून येते. सामनेवाला याने अर्जदार हि कमवती असल्याबाबत कोठेही कथन केलेले नाही. त्यामुळे अर्जदार हिला उत्पन्न मिळते याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर नाही. अंतरिम पोटगी मंजुर करताना न्यायालयाने अर्जदाराच्या जिवनावश्यक गरजा व दोन्ही पक्षकारांचे समाजातील स्थान व सामनेवाला यांचे उत्पन्न याचा विचार करुन अंतरिम पोटगी देणे न्यायोचीत राहिल, हे ठरविणे महत्त्वाचे आहे. सामनेवाला क्र. १ हा त्याच्या आई–वडीलांची जबाबदारी असून सामनेवाला क्र. १ याच्यावर कर्ज असल्याचे प्रतिज्ञापत्रात नमुद केले आहे. अर्जदार हिने दाखल केलेल्या मुळ अर्जात सामनेवाला क्र. २ व ३ हे वयोवृद्ध आहेत, हे दिसून येते. त्यामुळे सामनेवाला क्र. १ यांस त्याच्या आई–वडीलांची जबाबदारी आहे, हि बाब नाकारता येणार नाही. अर्जदार क्र. १ ते ३ व सामनेवाला यांचे समाजातील स्थान, राहणीमानाचा दर्जा व अर्जदाराच्या गरजा विचार करता अर्जदार क्र. १ हिला दरमहा ४,०००/– व अर्जदार क्र. २ व ३ यांना दरमहा प्रत्येकी ३,०००/– असे एकुण

१०,०००/- अंतरिम पोटगी देणे उचित होईल. म्हणुन मी मुद्दा क्र. २ चे उत्तर अंशत: होकारार्थी नोंदवून खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो. |
| २. | सामनेवाला क्र.१ याने अर्जदार क्र. १ हिला दरमहा ४,०००/- व अर्जदार क्र. २ व ३ यांना दरमहा प्रत्येकी ३,०००/- असे एकुण दरमहा १०,०००/-(एकुण दहा हजार) अर्जाचे अंतिम आदेशापावेतो अर्ज दाखल तारखेपासून अंतरीम पोटगी म्हणुन द्यावेत. |
| ३. | सदर आदेशाची प्रमाणित प्रत उभय पक्षकारांना विनामुल्य देण्यात यावी. |

PANKAJ HILAL PATIL
Digitally signed by PANKAJ HILAL PATIL
Date: 2026.05.02 17:11:41 +0530

राहुरी. (पी. एच. पाटील)
दिनांक : ०२/०५/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट नं.२, राहुरी